लोकसत्ता पु-पा-१.

# धुळवडीच्या दिवशी मद्यपींवर वाहतूक पोलिसांची करडी नजर

लोकसत्ता वार्ताहर

वसई: धुळवडीच्या दिवशी काही जण मद्यपान करून वाहने चालवितात. अशा मद्यपी चालकांना आवर घालण्यासाठी वसईच्या वाहतूक विभागाकडून धुळवडीच्या दिवशी विशेष तपासणी मोहीम हाती घेतली जाणार आहे.

धुळीवडीच्या सणाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन व मद्यपान करून वाहने चालविली जातात त्यामुळे अनेक ठिकाणी अपघातासारख्या गंभीर घटना घडतात. या घटना रोखण्यासाठी वसई, विरार शहरातील विविध ठिकाणच्या नाक्यावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. नालासोपारा येथील उड्डाणपुलाच्या खालील बाजूस, सिव्हीक सेंटर नालासोपारा, संतोष भुवन नालासोपारा, तर वसईतील बाभोला नाका, रेंज नाका या भागात तपासणीसाठी विशेष पथके ठेवली जाणार आहेत. याशिवाय फिरते भरारी पथकही ठेवले जाणार असल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले आहे. मद्यपान करून वाहने चालवून स्वतःसह इतर सर्वसामान्य नागरिकांचा जीव धोक्यात घालू नका, असे आवाहनही वाहतूक पोलिसांनी केले आहे. जे कोणी मद्यपान करून वाहने चालवतील त्यांची ब्रीथ अॅनालायझर यंत्राद्वारे तपासणी करून कारवाई केली जाणार आहे.

> धुळवड साजरी करताना काही जण मद्यपान करून वाहने चालवितात. यामुळे अपघात होऊन नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होतो. असे प्रकार टाळण्यासाठी कारवाईची विशेष मोहिम घेऊन मद्यपीना आवर घातला जाणार आहे.
>
> - सागर इंगोले,
> वाहतूक पोलीस निरीक्षक, वसई परिमंडळ २.

लोकसत्ता पु-पा-४.

# बेकायदा वृक्षतोडप्रकरणी गुन्हा दाखल करा

## वृक्षप्राधिकरण विभागाचे साहाय्यक आयुक्तांना आदेश

लोकसत्ता वार्ताहर

वसई : विरार पश्चिमेतील नंदाखाल येथे तलावाच्या ठिकाणी काही दिवसांपूर्वी वृक्षांची बेकायदा कत्तल करण्यात आली होती. याप्रकरणी आता पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाने वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश साहाय्यक आयुक्तांना दिले आहेत.

विरार पश्चिमेच्या नंदखाल कोफराड येथे चर्चजवळ प्राचीन तलाव आहे. या तलावाचे पालिकेकडून सुशोभीकरण करण्यात आले होते. सध्या या तलावाची अवस्था विकट झाल्याने पालिकेने पुन्हा नूतनीकरणाचे काम हाती घेतले आहे, परंतु हे काम करीत असताना तलावाच्या लगतच असलेल्या झाडांची कत्तल केल्याचा प्रकार घडला होता. झाडांचा अडथळा नसताना ती तोडल्याचा आरोप करत येथील नागरिकांनी पालिकेकडे तक्रार केली होती.

या तक्रारीनंतर पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाने प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी केली. झाडांची बेकायदा कत्तल केल्याप्रकरणी दोषींविरोधात गुन्हा दाखल करावा, असे आदेश प्रभाग समितीच्या 'ए' च्या साहाय्यक आयुक्तांना वृक्षप्राधिकरण विभागाच्या उपायुक्त नयना ससाणे यांनी दिले आहेत.

**आदेश चुकीचे :** बेकायदा वृक्षतोड ज्यांनी केली आहे, त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे जॉन परेरा यांनी पालिकेकडे केली होती. मात्र, आता पालिकेने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. ज्यांनी वृक्षतोड केली त्यांच्याविरोधात हे आदेश न देता इतर व्यक्तींच्या विरोधात दिले आहेत. त्यामुळे पालिकेकडून देण्यात आलेले कारवाईचे आदेश चुकीचे असल्याचा आरोप जॉन परेरा यांनी केला आहे. त्यामुळे पालिकेने यातील सत्यता पडताळून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी परेरा यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५-५-१०

# भरती प्रक्रियेविरोधात उच्च न्यायालयात याचिका

## शेकडो कंत्राटी कामगार बेरोजगार होण्याची भीती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेने ९७० जागांसाठी जाहीर केलेल्या सरळ सेवेतील भरती प्रक्रियेला राष्ट्रवादी काँग्रेसच्या कामगार युनियनने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या भरती प्रक्रियामुळे पालिकेत वर्षानुवर्षे कंत्राटी पद्धतीने काम करणारे कर्मचारी बेरोजगार होतील, अशी भीती व्यक्त करून कंत्राटी कामगारांना कायम करण्याची मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

वसई-विरार महापालिकेने स्थापनेनंतर प्रथमच सरळ सेवेतून कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. पालिकेच्या बिंदू नामावलीला मंजुरी मिळाल्याने भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे.

त्यानुसार क आणि ड वर्गातील ९७० पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. मात्र या भरती प्रक्रियेला राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनने न्यायालयात आव्हान दिले आहे. ही भरती प्रक्रिया रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायलयात याचिका दाखल करण्यात आली आहे. वसई विरार महापालिकेची स्थापना ४ नगर परिषद आणि ५५ ग्रामपंचायची मिळून झाली होती. तेव्हापासून अनेक कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र ते कंत्राटी पध्दतीने काम करत आहेत.

सध्या २ हजार ४०० कर्मचारी हे पालिकेच्या सेवेत कंत्राटी पध्दतीने काम करत आहेत. करोना काळातही या कर्मचाऱ्यांनी काम केले. या कर्मचाऱ्यांना आज ना उद्या पालिकेच्या सेवेत कायम करून घेतील ही आशा होती, मात्र पालिकेने त्यांना न घेता सरळ सेवेतून कर्मचारी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांनी सांगितले. पालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसारच ठेका कर्मचारी घेतले आहेत. मग आता नव्याने भरती प्रक्रियेची गरज काय असा सवाल त्यांनी केला आहे.

या याचिकेद्वारे भरती प्रक्रियेला स्थगिती देऊन कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्याची मागणी घेण्यात आली आहे. आमचा सरळ सेवेतील भरती प्रक्रियेला विरोध नाही. मात्र स्थानिक कर्मचारी वर्षानुवर्षे काम करत आहे. त्यांच्या कामाचा, अनुभवाचा पालिकेला फायदा होणार आहे. बाहेरून आलेला नवीन कर्मचारी आणि स्थानिक कर्मचारीयात फरक असणार असेही ते म्हणाले.

### अजित पवार यांची आयुक्तांबरोबर चर्चा

ठेका कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन हा प्रश्न मांडला. अजित पवार यांनी देखील या प्रश्नावर आयुक्त अनिलकुमार पवार यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. पवार यांनी कंत्राटी कामगारांना न्याय देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती राष्ट्रवादीचे वसई विरार जिल्हाअध्यक्ष राजाराम मुळीक यांनी दिली. दरम्यान, वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या भरती प्रक्रियेत स्थानिकांना प्राधान्य देण्याची मागणी केली आहे.

म. टा. ५-५-१

# कंत्राटी कर्मचारी न्यायालयात

## वसई-विरार पालिकेतील भरतीचा वाद



**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार शहर महापालिकेमध्ये ९७० जागांसाठी प्रथमच सरळ सेवेतून भरती प्रक्रिया होणार आहे. मात्र या पूर्वीच या भरती प्रक्रियेला ग्रहण लागले आहे. वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेमध्ये सामावून घ्यावे, या मागणीसाठी राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करत या भरती प्रक्रियेला आव्हान दिले आहे.

वसई-विरार महापालिकेची स्थापना २००९मध्ये झाली. तेव्हापासून पालिकेतील सरळ सेवेत भरती प्रक्रिया रखडली होती. यातील ९७० पदांवर सरळ सेवेतून भरती करण्यासाठी मागील महिन्यांत हालचाली सुरू करण्यांत आल्या होत्या. भरतीमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्याची मागणी राष्ट्रवादीतर्फे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडे करण्यात आली होती. याबाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून विनंती करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले होते. आता या कंत्राटी कर्मचाऱ्यांना भरतीत प्राधान्य द्यावे, या मागणीसाठी नुकतीच राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनतर्फे मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येते की, नव्याने भरती प्रक्रिया होते, हा निर्णय आता उच्च न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून असेल.

महापालिकेत मोठ्या संख्येत कंत्राटी कर्मचारी सेवा बजावत आहेत. मात्र यातील अनेक कंत्राटी कर्मचारी हे अकुशल आणि कमी शैक्षणिक अर्हताप्राप्त आहेत. त्यामुळे कामकाजात दिरंगाई आणि योग्य पद्धतीने काम न करणे अशा घटना घडत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे कारभार हा कंत्राटी कर्मचाऱ्यांवर न ठेवता, सरळ सेवेतून कायम कर्मचाऱ्यांची भरती करण्याची मागणी आहे. मात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांमधील काही मोजक्या कुशल कर्मचाऱ्यांना आणि शैक्षणिक अर्हताप्राप्त कर्मचाऱ्यांना संधी व प्राधान्य मिळावे, असे म्हणणे आहे.

Scanned with CamScanner

लोकसत्ता ५-मा-४.

# परिवहन कंत्राटदाराच्या मुलाची कर्मचाऱ्याला मारहाण

## मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिकेच्या परिवहन कर्मचाऱ्याला भर रस्त्यात परिवहन कंत्राटदाराच्या मुलाने मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली आहे. याप्रकरणी मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, आरोपी फरार झाला आहे.

मीरा-भाईंदर पालिकेची परिवहन सेवा ही कंत्राटदाराच्या मदतीने चालवली जाते. सध्या हे कंत्राट तात्पुरत्या स्वरूपात 'महालक्ष्मी कृपा इन्फ्रा'या संस्थेला देण्यात आले आहे. मीरा रोडच्या एस. के. स्टोन परिसरातून कंत्राटदाराचा मुलगा गवीन बोजीर्स हा दुचाकीने प्रवास करत असताना परिवहनच्या एका बस चालकाने त्याला पुढे जाऊ दिले नाही. त्याचा राग गवीन याला आला. त्याने प्रवाशांनी भरलेल्या त्या बसचा पाठलाग करून बस चालकाला मारहाण केली. या घटनेचे एका प्रवाशाने आपल्या मोबाइलमध्ये चित्रीकरण करून ते समाज माध्यमांवर प्रसारित केले. त्यामुळे इतर परिवहन कर्मचाऱ्यांना या घटनेची माहिती मिळाली.

कंत्राटदाराच्या मुलाची ही दादागिरी योग्य नसल्यामुळे कर्मचाऱ्यांनी काम बंद करण्याचा निर्णय घेतला. तसेच या संदर्भात मीरा रोड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. बस चालकाच्या तक्रारीवरून मीरा रोड पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर कर्मचाऱ्यांनी कामास सुरुवात केली. मात्र, पाच तास परिवहन सेवा ठप्प झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय झाली. सध्या आरोपीला अजूनही अटक झाली नसल्याची माहिती मीरा रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी विजय कुमार बागल यांनी दिली.



### कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याची मागणी

मीरा-भाईंदर महापालिकेने परिवहन सेवा चालवण्याचे कंत्राट हे तात्पुरत्या स्वरूपात 'महालक्ष्मी कृपा इन्फ्रा' या संस्थेला दिले आहे. मात्र, हा कंत्राटदार मनमानी पद्धतीने आपला कारभार करत आहे. परिवहन कर्मचाऱ्यांना योग्य वागणूक देत नाही. त्यामुळे पालिकेने या कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करावे, अशी मागणी परिवहन कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

लोकमत ५-मा-२.

# विद्यार्थ्यांसाठी वाहतूक पोलिसांनी घेतला पुढाकार

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये दहावीच्या परीक्षेसाठी १० हजार ६०६ विद्यार्थी बसले आहेत. परीक्षेची २१ केंद्र असून २५ मार्चपर्यंत परीक्षा चालणार असल्याने केंद्रात पोहोचायला वाहनकोंडीमुळे विलंब होऊ नये, यासाठी वाहतूक पोलिस सज्ज झाले आहेत.

दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी उशीर होऊ नये म्हणून मीरा भाईंदर वाहतूक शाखेने नियोजन केले आहे. शहरात मुख्य ठिकाणी व दहावी-बारावीच्या परीक्षेचे केंद्र असलेल्या शाळा व महाविद्यालय परिसरात वाहतूक पोलिस व वॉर्डन तैनात करण्यात आले आहेत.

दहावी व बारावी परीक्षेसाठी प्रत्येक केंद्रात एक महिला व एक पुरुष पोलिस अंमलदार तसेच केंद्राच्या शंभर मीटर परिसरात दोन पुरुष पोलिस अंमलदार व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान नेमण्यात आले आहेत. शिवाय पोलिसांची फिरती गस्त वाहने वेळोवेळी परीक्षा केंद्र आणि परिसरात फिरून आढावा घेणार आहेत. परीक्षेच्या अनुषंगाने पोलिसांनी मनाई आदेश लागू केले असल्याचे वाहतूक विभागाचे सहायक पोलिस आयुक्त विनायक नरळे यांनी सांगितले.

Scanned with CamScanner

लोकमत पा-नं.२.

# मुलीला डॉक्टर बनविण्यासाठी ५० लाख गमावले

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मुलीला नवी मुंबईतील तेरणा वैद्यकीय महाविद्यालयात व्यवस्थापक कोट्यातून प्रवेश मिळवून देतो, असे सांगून मीरा रोडच्या डॉक्टर दाम्पत्याची ५० लाखांची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. तसेच पैसे परत मागितले असता दाम्पत्याला धमकी दिल्याप्रकरणी नया नगर पोलिसांनी बुधवारी ८ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

मीरा रोडच्या नया नगर भागातील अफसर व नझीर हे डॉक्टर दाम्पत्य आयशा आणि हुदा या दोन मुलींसह राहतात. आयेशा ही मुंबईच्या बीएमसी रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण घेत आहे, तर लहान मुलगी हुदा हिने २०१९ मध्ये नीटची परीक्षा दिली होती. तिला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी फोन येत होते. जुलै २०१९ मध्ये किरण निचिते याने फोन करून आपण मंत्रालयात बसतो. तुमच्या मुलीचे ॲडमिशन करायचे असेल, तर मंत्रालयात भेटा, असे सांगितले. अफसर भेटण्यासाठी गेल्या असता निचितेने मंत्रालयाजवळील भाजपच्या कार्यालयात त्यांना नेले. तेथे ५ वैद्यकीय महाविद्यालयांची नावे सांगून व्यवस्थापक कोट्यातील ॲडमिशनसाठी ८० लाख ते १ कोटी लागतील, असे सांगितले.

त्याने ठाण्याच्या अल्पिन डायग्नोस्टिक सेंटर येथे त्यांना बोलावले. तेथेही अफसर व नझीर गेले. तेथे निचितेसह अखिलेश पाल होता. पाल याने तेरणा वैद्यकीय महाविद्यालयासाठी ९५ लाख, पुण्याच्या एमआयएमईआरसाठी ८० लाख व काशीबाई नवले महाविद्यालयासाठी ८५ लाख, नाशिकच्या वसंतराव पवार महाविद्यालयासाठी ९० लाख आणि मुंबईच्या के. जे. सोमय्यासाठी १ कोटी रुपये व्यवस्थापक कोट्यातून ॲडमिशनसाठी भरावे लागतील, अशी दरांची यादीच मांडली.

अन्सारी दाम्पत्याने तेरणा मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशनसाठी ८० लाख रुपये देण्याची तयारी दाखवली. त्यानंतर रोख व आरटीजीएसद्वारे किरण निचिते, राकेश वर्मा, लव गुप्ता, राजू पाटील, गणेश, नीलेश व कश्यप यांनी अन्सारी दाम्पत्य आणि त्यांच्या नातलगांकडून टप्प्याटप्प्याने ५० लाख रुपये उकळले. ॲडमिशनचा अर्ज भरून घेतला व त्यासाठीचा धनादेशही घेतला. मात्र, ॲडमिशन करून दिली नाही.

## धमकीनंतर गाठले पोलिस ठाणे



अन्सारी दाम्पत्याने पैसे मागितले असता, तुमची मुलगी सायन रुग्णालयात शिक्षण घेत आहे. तिला बघून घेऊ, अशी धमकी दिली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच डॉक्टर दाम्पत्याने थेट पोलिस ठाणे गाठले. आरोपींवर गुन्हा दाखल झाला आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करत आहेत. किरण निचिते हा शहापूरच्या वासिंद भागातील राहणारा आहे.

पुण्यनगरी पृ.५.७.

# जिजाऊ संघटनेचे आमरण उपोषण स्थगित

## मुख्यमंत्र्यांनी साधला आंदोलकांशी फोनवरून संवाद



**पालघर:** पालघर जिल्ह्यातील विविध पाटबंधारे प्रकल्पातील बाधित कुटुंबांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन झाले नसल्याने तसेच प्रकल्पबाधितांचे अनेक प्रश्न प्रलंबित राहिल्यानं जिजाऊ संघटनेने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू केलेले आंदोलन स्थगित केलं. यासंदर्भात मंत्रालय स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

पालघर जिल्ह्यात असणारा विविध पाटबंधारे प्रकल्पांच्या प्रकल्पग्रस्तांना सरकारी अनास्थेमुळे विविध समस्यांना गेली काही दशक सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांबाबत जिल्हास्तरावर तसेच राज्यस्तरावर तोडगा निघत नसल्याने जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष नीलेश सांबरे यांच्यासह प्रकल्प बाधित २८ फेब्रुवारीपासून उपोषणाला बसले होते. यासंदर्भात २८ फेब्रुवारीच्या सायंकाळी जिल्हाधिकारी यांनी आंदोलकांशी चर्चा करून विषय सोडवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, खा. राजेंद्र गावित यांच्या कन्येच्या विवाह प्रीत्यर्थ आयोजित स्वागत समारंभाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह इतर मंत्री येणार असल्याने त्यांच्या समक्ष चर्चा करून निर्णय घेऊ, अशी भूमिका घेण्यात आली होती. १ मार्च रोजी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, मंत्री दादा भुसे यांच्यासह पाच-सहा आमदारांनी पालघर येथे क्रिकेटपटू शार्दुल ठाकूर यांच्या विवाहप्रीत्यर्थ स्वागत समारंभाला भेट दिली. मात्र, आंदोलन सोडवण्यासाठी आंदोलकांतर्फे प्रयत्न केल्यानंतरदेखील या सर्व मान्यवरांनी आंदोलकांकडे पाठ फिरवत थेट खा. गावित यांच्या समारंभात हजेरी लावली. अखेर मुख्यमंत्री पालघरला आल्याचे समजताच शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखांनी मुख्यमंत्र्यांशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. या वेळी आंदोलकांच्या विषयांवर तोडगा काढण्यासाठी मंत्रालयात बैठकीच्या आयोजनाचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पु.५ा.१०

# काशिमीरा येथील नागरिक सिमेंट रस्त्याच्या प्रतीक्षेत

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका प्रभाग १४ मधील काशिमीरा या भागातील रस्त्याची दुर्दशा झाली आहे. रस्त्यामध्ये मोठमोठे खड्डे पडले असून धूळ उडत आहे. रस्त्यात पडलेले खड्डे व धुळीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. सिमेंट रस्ता बनणार असल्यामुळे गेल्या सहा महिन्यांपासून रस्त्यात पडलेले खड्डे बुजवले जात नाही. माजी लोकप्रतिनिधी व महापालिका याकडे दुर्लक्ष करत असल्याचा नागरिकांनी आरोप केला आहे. सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन होऊन एक महिना झाला तरीही प्रत्यक्षात रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नसल्यामुळे नागरिक सिमेंट रस्त्याच्या प्रतीक्षेत आहेत.



मीरा-भाईंदर महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये रस्त्यांसाठी १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. एमएमआरडीएकडून रस्त्यांची कामे करण्यासाठी हा निधी देण्यात आला असून या कामाची निविदा प्रक्रिया झाली असल्याचे भूमिपूजन करताना सांगण्यात आले. परंतु अद्यापपर्यंत ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आलेला नसल्याची माहिती मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी रोजी आमदार प्रताप सरनाईक यांच्या हस्ते रस्त्याच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. जवळपास भूमिपूजन करून एक महिना झाला परंतु अद्याप रस्त्याचे काम सुरू झाले नसल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सिमेंट रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी रस्त्याची कामे करण्यासाठी ठेकेदारांना दोन दिवसात कार्यादेश दिले जाणार असल्याचे आ. सरनाईक यांनी सांगितले होते, परंतु भूमिपूजन होऊन एक महिना झाला तरीही प्रत्यक्षात रस्त्यांच्या कामाला सुरुवात झालेली नाही. काशिगाव येथील रस्त्याच्या कामाचे दोन पॅकेजमध्ये कार्यादेश काढण्यात येणार आहेत. त्यापैकी एका कामाचा कार्यादेश काढण्यात आला आहे ते काम येत्या आठ दिवसात सुरू होणार आहे. तर दुसऱ्या पॅकेजचा कार्यादेश अद्याप काढण्यात आलेला नाही. तो कार्यादेश लवकर काढण्यात येणार आहे, अशी माहिती एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. तरी या प्रभागातील रस्त्याचे काम लवकर सुरू करावे व नागरिकांना होणाऱ्या त्रासातून सुटका करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पुढारी पु.५ा.३०

# घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक

## वसई, पालघर, मुंबईतील अनेक गुन्ह्यांची उकल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

वसई विरार परिसरात घरफोडी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील आरोपींना गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांनी अटक केली आहे. या आरोपीकडे चौकशी केली असता पेल्हार पोलीस ठाणे, आचोळे पोलीस ठाणे, माणिकपूर पोलीस ठाणे , सायन पोलीस ठाणे, मुंबई या भागात घरफोडीचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. आरोपी अरमान शौकिन खान याच्या विरोधात खार, वांद्रे, माहीम, गोरेगाव, बांगुरनगर, मालाड, एम. एच. बी. बोरीवली, समता नगर , मुंबई येथे २५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत.

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या ज्योती अर्जुन जाधव यांच्या घरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरफोडी करून २ लाख १३ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करून नेल्याबाबत माणिकपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वसई-विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासून घरफोडी चोरींमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वरिष्ठांनी चोरी करणाऱ्या आरोपी यांचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष २, वसई युनिटचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तपास करून अरमान शौकिन खान, रवि मुन्नालाल जोनालीया यांना गुजरात येथे प्रवास करत असताना ताब्यात घेण्यात आले.

आरोपी यांच्याकडे असलेल्या सामानामधुन घरफोडीचे गुन्हे करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या २ कटावण्या, पाना आणि स्क्रुडायव्हर अशी हत्यारे त्याचप्रमाणे महागडी घडयाळे, जुन्या बंद झालेल्या चलनी नोटा, पाकिटे, हार्ड डिस्क, मोबाईल आणि रोख रक्कम असा ऐवज मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला असून त्यांना गुन्हयात अटक करण्यात आली. या आरोपींकडे अधिक तपास केला असता आरोपी हे दिल्ली येथून घरफोडी चोऱ्या करण्यासाठी त्यांचा साथीदार रमेशकुमार बैसाखीराम कालु ऊर्फ एलीवास कालु यांच्यासोबत येत असल्याचे उघडकीस आले. हे आरोपी पोलिसांच्या हाती लागल्याने अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

Scanned with CamScanner

पुढारी ५-५-२०

# बनावट इन्स्टाग्रामद्वारे अश्लील व्हिडीओ पाठवणाऱ्याला अटक

**मिरा रोड :** एका इसमाने बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून महिलेचे अश्लील व्हिडिओ व फोटो पाठवणाऱ्याला सायबर गुन्हे शाखेने अटक केली आहे.

मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या सायबर गुन्हे शाखेला महाराष्ट्र सायबर शाखेकडून एका महिलेने केलेली तक्रार मिळाली होती. ही तक्रार चाइल्ड पॉर्नोग्राफी व चाइल्ड सेक्सुअल अब्युज मटेरियल अश्या प्रकारची होती. तक्रारीमध्ये महिला तक्रारदार यांचे खाजगी फोटो व व्हिडीओ बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून प्रसारीत करण्यात आले होते. तक्रारदार महिलेने मनास लज्जा उत्पन्न झाल्या बाबत सांगितले होते. सायबर गुन्हे शाखा यांनी तपास करून बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून अश्लिल व्हिडीओ व फोटो पाठविणारा प्रतिश कोठारी याचा शोध घेवुन त्याला ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नयानगर पोलीस करत आहेत. मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ ५-नं.-२०

# भिन्नधर्मीय प्रेमसंबंधाचा लव्ह जिहादशी संबंध नको!

## उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निरीक्षण

मुंबई, ता. २ : दोन भिन्नधर्मीय युवक-युवतींचे प्रेमसंबंध असतील, तर लगेच त्याचा संबंध लव्ह जिहादशी लावण्याची आवश्यकता नाही, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नोंदवले आहे. या प्रकरणातील मुस्लिम युवती आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांना न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

सदर प्रकरणात मुस्लिम युवतीचे एका अनुसूचित जातीतील युवकाशी प्रेमसंबंध होते; पण त्याने ही गोष्ट दडवून ठेवली होती. मुलीने त्याला धर्मांतर करायला सांगितले. मुलीच्या पालकांनी प्रेमसंबंधास विरोध केला नाही आणि मुलीनेदेखील मान्यता दिली; मात्र पुढे त्यांच्यात नाते बिघडले. याप्रकरणी मुलाने युवती आणि तिच्या कुटुंबीयांवर लव्ह जिहादचा आरोप केला आणि त्यांच्याविरोधात मुलाने पोलिसांकडे तक्रार नोंदवली होती. याप्रकरणी औरंगाबादमधील न्यायालयाने संबंधित मुलगी आणि तिच्या कुटुंबातील सदस्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला होता. त्यामुळे त्यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. यावर न्या. विभा कनकवाडी आणि न्या. अभय वागवसे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. न्यायालयाने या निकालात लव्ह जिहादवर महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले.



### काय म्हणाले न्यायालय?

1. तक्रारदार संबंधित मुलीच्या प्रेमात होता आणि अनेकदा संधी असूनही त्याने हे नाते सोडण्याचा प्रयत्न केला नाही, हे त्याने स्वतः मान्य केले आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे.
2. लव्ह जिहाद ही कट्टरतावाद्यांनी रुजवलेली संकल्पना असून त्याला कोणताही आधार नाही. यामध्ये हिंदू मुलीला मुस्लिम मुलाकडून लक्ष्य करण्यात येते आणि तिचे धर्मांतर करण्यात येते, असा दावा करण्यात येतो; मात्र या प्रकरणात पीडित मुलगा आहे हे विशेष आहे.
3. केवळ मुलगा-मुलगी दोन वेगळ्या धर्मांचे आहेत आणि ते एकमेकांच्या प्रेमात होते. परंतु आता त्यांच्यातील नाते बिघडले म्हणून त्यास थेट लव्ह जिहाद असे नाव देता येणार नाही. केवळ धर्मांतर करण्यासाठी तक्रारदाराला लक्ष्य केले, असेही म्हणता येणार नाही, असे स्पष्ट निरीक्षण खंडपीठाने नोंदवले आणि अटकपूर्व जामीन मंजूर केला.

Scanned with CamScanner

लोकमत

# नालासोपाऱ्यात अमली पदार्थांसह नायजेरियन नागरिक जेरबंद

## तुळींज पोलिसांची कामगिरी : ५८ लाख ७४ हजारांचा साठा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : शहरातील पूर्वेकडील परिसरात बुधवारी रात्री ५८ लाख ७४ हजारांचे अमली पदार्थ बाळगणाऱ्या नायजेरियन नागरिकाला अटक करण्यात तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. तुळींज पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली आहे.

तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल यांना प्रगतीनगर येथील जीवदानी हॉलच्या बाजूला अमली पदार्थ विक्री करण्यासाठी परदेशी नागरिक येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार, प्रगतीनगर येथील जीवदानी हॉलच्या बाजूला गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी आणि पोलिस अंमलदारांनी सापळा लावला होता. त्याचवेळी एक नायजेरियन तेथून पळू लागल्यावर पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली. आरोपीकडे १०२.४०० ग्रॅम वजनाचा १० लाख २४ हजार रुपये किमतीचा एमडी अमली पदार्थ मिळून आला. तसेच त्याच्या घराची झडती घेतल्यावर १७ लाख २२ हजार ५०० रुपये किमतीचा १७१.२५० ग्रॅम कोकेन आणि ३१ लाख २८ हजार ३०० रुपये किमतीचे २२३.४५ ग्रॅम एमडी, एमए अमली पदार्थ मिळून आल्याने जप्त केला आहे. ईदे इम्यानूवेल ईदे पॉल (२६) असे आरोपी नायजेरियनचे नाव आहे.



पोलिस उपायुक्त सुहास बावचे पत्रकार परिषदेत माहिती देताना.

### यांनी केली कामगिरी

पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त डॉ. शशिकांत भोसले व वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक मिथुन म्हात्रे व इतरांनी ही कामगिरी केली.

आरोपीला गुरुवारी वसई न्यायालयात हजर केल्यावर ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपासासाठी गुन्हा नार्कोटिक्सला वर्ग करणार आहे.

\- सुहास बावचे, पोलिस उपायुक्त.



Scanned with CamScanner

लोकमत




रझिया गँगच्या दोन आरोपींना गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने राजस्थानहून ताब्यात घेतले.

# रझिया गँगच्या दोघांना राजस्थानातून केली अटक

## गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : दिल्लीतील सराईत रझिया गँगच्या दोन आरोपींना पकडण्यात गुन्हे शाखा युनिट-२ च्या टीमला यश मिळाले आहे. दोन्ही आरोपी खासगी बसने राजस्थानवरून दिल्लीला पळून जात असताना फालना येथे पोलिसांनी ताब्यात घेतले. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सहा गुन्ह्यांची उकल करून दोन्ही आरोपींना तपास व चौकशीसाठी माणिकपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

वसईच्या अंबाडी क्रॉस पंचवटी हॉटेलजवळील दिवान मेन्शनमध्ये राहणाऱ्या ज्योती जाधव यांच्या घरी २१ फेब्रुवारीला रात्री साडेअकराच्या सुमारास घराचा बंद दरवाजा उघडून चोरट्यांनी प्रवेश करत रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा २ लाख १३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला होता. माणिकपूर पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला होता. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळावरून सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. दोन्ही आरोपी हे हद्दीत तीन दिवस एका लॉजवर थांबल्याचे निष्पन्न झाल्यावर त्या ठिकाणाहून सीसीटीव्ही, कागदपत्रे, मोबाईल नंबर मिळवून तपास सुरू केला. अहमदाबाद येथे गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुहास कांबळे यांना पथकासह रवाना केले.

आरोपी हे अहमदाबादवरून जयपूर येथे खासगी बसने प्रवास करत असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांना फालना राजस्थान येथून ताब्यात घेतले आहे. अरमान शोकीन खान (३१) आणि रवी मुन्नालाल जोलानिया (३२) अशी त्यांची नावे आहेत. आरोपी आरमान खान याच्यावर मुंबई व आजूबाजूच्या परिसरात २५ पेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याचे सूत्रांकडून कळते.

### दिल्लीची प्रसिद्ध रझिया गँग

घरफोडी करण्यासाठी प्रसिद्ध अशी दिल्लीत एकेकाळी ही गँग कार्यरत होती. रझिया सुलतान सैफी ही गँग चालवत होती, पण तिचा २०१२ मध्ये मृत्यू झाल्यानंतर तिची बहीण शबनम शेख हिने आपल्याकडे या गँगची सूत्रे घेतली. या गँगवर आतापर्यंत सव्वाशेपेक्षा अधिक घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. या गँगचे सदस्य मुंबई व आजूबाजूच्या परिसरातील घरांची रेकी करून घरफोडी करतात.



Scanned with CamScanner

लोकमत

# तरुणीला अश्लील मेसेज करणाऱ्या आरोपीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये राहणाऱ्या एका १८ वर्षीय तरुणीला मोबाइलवर व्हॉट्सॲपद्वारे अश्लील मेसेज करणाऱ्या आरोपीला विरार पोलिसांनी डोंबिवली येथून बुधवारी अटक केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

विरारमध्ये राहणाऱ्या १८ वर्षीय तरुणीला २७ फेब्रुवारीला मोबाइलवर एका मोबाइल नंबरवरून कॉल आला. तिने त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र त्यानंतरही आरोपीने या तरुणीशी जवळीक साधण्यासाठी तिच्या व्हॉट्सॲपवर अश्लील मेसेज केला. यामुळे तरुणी घाबरली.

पीडित तरुणीने घरच्यांना याबाबत सांगितल्यावर २७ फेब्रुवारीला विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला. विरार डीबीने गुन्ह्याचा तपास करत आरोपी सुनील कनोजिया (३०) याला डोंबिवली येथून बुधवारी अटक केली.

गुरुवारी आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती विरारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी दिली. आरोपीची सखोल चौकशी विरार पोलिस करीत आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Mar 03, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

मूल्य ₹ 5.00

सुविचार
कठिनाइयों से ही हमारे जीवन के धैर्य की परीक्षा होती है, इनसे ही आपके अंदर के सामर्थ्य का पता चलता है।

दैनिक दबंग दुनिया
मुंबई, शुक्रवार 3 मार्च 2023
निष्पक्ष नजर, निष्पक्ष खबर
देश का सबसे चर्चित संपूर्ण हिन्दी अखबार

अंदर पढ़ें



# अंतरराज्यीय चोर गिरोह के 2 आरोपी गिरफ्तार



**दबंग रिपोर्टर » वसई**

अंतरराज्यीय चोर गिरोह के आरोपी को एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच यूनिट 2 (वसई) की टीम ने राजस्थान से धरदबोचा है। आरोपी पर कई आपराधिक मामले दर्ज बताया गया है।

यह जानकारी पुलिस ने गुरुवार को दी है। पुलिस ने बताया कि वसई पश्चिम के अंबाडी क्रॉस पंचवटी हॉटिल, मॅन्शन बिल्डींग में रहने वाली ज्योति अर्जुन जाधव (43) नामक महिला के घर में दिनदहाड़े घुसकर घुसकर 2 लाख 13 हजार मूल्य के सोने के गहने और नगद उड़ा दिया। इस मामले में पीड़ित महिला माणिकपूर पुलिस स्टेशन में चोरी का मामला दर्ज कराया। पुलिस के मुताबिक, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, वसई-विरार क्षेत्र में पिछले कुछ महीनों से घर में चोरी की घटनाएं दिन-ब-दिन बढ़ती जा रही हैं, वरिष्ठ अधिकारियों ने उक्त घटनाओं पर गंभीरता से ध्यान दिया है और आरोपियों का पता लगाने के निर्देश दिए हैं। पुलिस ने बताया कि अंडरकवर सूचना के आधार व तकनीकी विश्लेषण के माध्यम से क्राइम ब्रांच 02 के पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने आरोपी अरमान शौकिन खान (32) व रवि मुन्नालाल जोनालीया (32), जो दोनो दिल्ली के रहने वाले को अहमदाबाद, राज्य गुजरात की ओर जाते समय हिरासत में लिया,इन दोनों को राजस्थान से गिरफ्तार किया गया है। इनके पास से चोरी करने के हथियार,महंगी घड़ियां, पुराने नोट, हार्ड डिस्क, मोबाइल और नगद जब्त किया गया। आरोपी से पूछताछ के दौरान, उसने कहा कि उसने अपराध किया था, उसे उक्त अपराध के लिए गिरफ्तार किया गया,आगे की जांच पर,आरोपी से आगे पूछताछ करने पर पता चला कि वह अपने साथी रमेश कुमार बैसाखीराम कालू उर्फ एलीयास के साथ दिल्ली से चोरी करने आ रहा था, गिरफ्तार आरोपियों से कुल 6 अपराधों (चोरी ) का खुलासा हुआ है।

पुलिस ने कहा कि गिरफ्तार आरोपी अरमान शौकिन खान के खिलाफ खार,चांद्रा, माहिम, गोरेगांव, बांगुरनगर, मालाडे, एम.एच.बी बोरीवली, समता नगर पुलिस स्टेशन मुंबई में 25 से अधिक मामले दर्ज हैं।यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट पी.आई शाहूराज रनवरे व एपीआई सुहास कांबले के नेतृत्व में पुलिस अधिकारी व कर्मचारियों ने पाई है।

Scanned with CamScanner